३३५१८

क्रमांक: सगृयो १०९४/प्र.क्र.२७७/१४सी,
सहकार व वस्त्रोधोग विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १० मार्च १९९५.

आ दे श

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०.

सहकारी संस्थांचे अधिनियम १९६० [येथून पुढे " सदर कायदा" असा शब्द प्रयोग वापरण्यात येईल.] कलम ७ मधील अधिकाराचा वापर करुन शासन सदर कायद्यातील कलम ६ उप कलम १ मधील तरतुदीनुसार सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदविण्यासाठी " कमित कमी १० व्यक्ती असल्या पाहिजेत" या तरतूदीतून खालील अटींच्या अधिन राहून सूट देत आहे :-

अ] नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थामधील प्रत्येक सदनिकांचे जोते क्षेत्र [Plinth area ] ७०० चौ. फूटापेक्षा जास्त असू नये.

ब] नियोजित संस्थांच्या जमिनीमध्ये/इमारतीमध्ये चटई क्षेत्र निर्देशांक वापरण्याकरिता शिल्लक नसला पाहिजे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ श. कृ. कलाल ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
सहकार व वस्त्रोधोग विभाग.

कृ.मा.प.

प्रति,

१] सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२] विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था [ सर्व ]

३] जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, [सर्व ]

४] अध्यक्ष, मुंबई जिल्हा सहकारी संस्थांचे महासंघ, विकास प्रिमायसेस, फोर्ट, मुंबई

५] व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई.

त्यांना विनंती आहे की, सदर आदेश शासन राजपत्र, असाधारण भाग-४ ब दि. १० मार्च, १९९५ मध्ये प्रकाशित करुन त्याच्या १०० प्रती या विभागाला पाठवाव्यात.

[ श. कृ. कलाल ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
सहकार व वस्त्रोद्योग विभाग.